महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / | FAX- 020/25536761 E-MAIL - sscboardpune@gmail.com Website- www.sscboardpune.in |
|---|---|---|

जा.क पुविमं / माध्य शाखा क / 422
पुणे–411005
दिनांक : 19 / 01 / 2026

प्रति,
मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रु–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत (Hall Ticket).....

संदर्भ : जावक क्र.रा.मं/परीक्षा–७/१६५, दि. १६/०१/२०२६.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, फेब्रु–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेची प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सदर सर्व माध्यमिक शाळांना फेब्रु–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ पासून Admit Card या Link व्दारे Download करण्यासाठी उपलबध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे त्वरित संपर्क साधावा. ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रु–मार्च २०२६ मधील (इ. १० वी) परीक्षेसाठी सर्व माध्यमिक शाळांनी इ. १० वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना paid ऑनलाईन status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे Paid Status Admit card या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No. विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे Extra Seat No. Admit Card या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील.

५. Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/जन्मतारीख/जन्मठिकाण अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरिता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर Correction Admit Card या Link द्वारे सुधारित Admit Card उपलब्ध होतील. **विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.**

६. ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून Late paid Status Admit Card या Option द्वारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापकांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (Duplicate) असा शेरा देवून विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

९. सर्व माध्यमिक शाळांनी No Candidate केलेल्या परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित परीक्षार्थ्यांना वितरीत करू नयेत.

तरी फेब्रु–मार्च २०२६ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

MBRaut

(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

1. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर